महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती


# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २०५ वे | दिनांक : १९/०७/२०२६ | वार : रविवार

# मतदार यादीत नाव निश्चित करा; घरबसल्या भरा एस.आए.आर फॉर्म



**मुंबई** : सध्या महाराष्ट्रासह देशभरात मतदार याद्यांचे विशेष सखोल परीक्षण, म्हणजेच 'एसआयआर' (Special Investigation of Rolls - SIR) मोहीम वेगाने सुरू आहे. या मोहिमेत बूथ लेव्हल ऑफिसर (BLO) घरोघरी जाऊन मतदारांना एक महत्त्वाचा फॉर्म देत आहेत. हा फॉर्म तुम्ही ऑनलाईन किंवा ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतीने सबमिट करू शकता. हा फॉर्म मोबाईलवरून ऑनलाईन कसा भरायचा, याची अगदी सोपी पद्धत सविस्तर जाणून घेणार आहोत.

ॲप डाऊनलोड करा: सर्वप्रथम तुमच्या मोबाईलमधील प्ले-स्टोअर (Play Store) वर जाऊन ECINET हे अधिकृत ॲप सर्च करा आणि ते इन्स्टॉल करा.

नोंद शोधा व स्क्रीनशॉट घ्या: ॲप ओपन केल्यावर तुम्हाला अनेक पर्याय दिसतील. सर्वप्रथम २००२ च्या मतदार यादीच्या लिस्टमध्ये तुमच्या आईचे किंवा वडिलांचे नाव शोधा. जर पालकांचे नाव नसेल, तर घरातील इतर जवळच्या नातेवाईकांचे नाव शोधा. हे नाव सापडताच त्याचा एक स्क्रीनशॉट (Screenshot) काढून मोबाईलमध्ये सुरक्षित ठेवा. हा स्क्रीनशॉट तुम्हाला पुढे फॉर्म अपलोड करताना लागणार आहे.

•ॲपच्या होम स्क्रीनवर असलेल्या Voter Registration Form या पर्यायावर क्लिक करा.

•त्यानंतर समोर येणाऱ्या SIR form fill Online या बटणावर क्लिक करा.

•येथे तुम्हाला मोबाईल नंबर विचारला जाईल. जर तुमचे आधीच अकाऊंट असेल, तर नंबर टाकून ओटीपी (OTP) द्वारे थेट लॉगिन करा.

•जर तुम्ही नवीन युझर असाल, तर New User वर क्लिक करून मोबाईल नंबर टाका, ओटीपी पडताळणी करा आणि तुमचे नवीन रजिस्ट्रेशन पूर्ण करा. रजिस्ट्रेशन झाल्यावर पुन्हा वरील पर्यायांवर क्लिक करून पुढे जा.

ॲपमध्ये तुमचे राज्य निवडा आणि तुमचा EPIC नंबर (मतदार ओळखपत्र क्रमांक) टाकून सबमिट करा. यानंतर तुमची संपूर्ण माहिती स्क्रीनवर दिसेल.

महत्त्वाची टीप: या माहितीमधील तुमचे इंग्लिश नाव आणि सरकारी ओळखपत्रावरील (जसे की आधार कार्ड) इंग्लिश नाव जर तंतोतंत जुळत असेल (Same असेल), तरच तुम्हाला हा फॉर्म ऑनलाईन भरता येईल. नावात किंवा स्पेलिंगमध्ये काहीही चूक असल्यास, तुम्हाला ऑफलाईन पद्धतीनेच फॉर्म भरावा लागेल.

जर तुमचा मोबाईल नंबर मतदार आयडीशी लिंक नसेल, तर स्क्रीनवर खाली दिलेल्या Click Here या पर्यायावर क्लिक करून आधी मोबाईल नंबर लिंक करून घ्या. याशिवाय पुढील प्रक्रिया सुरू होणार नाही. नंबर लिंक झाल्यावर Enumeration Form वर परत येऊन ओटीपी सबमिट करा.

ओटीपी सबमिट केल्यावर तुमच्यासमोर ४ पर्यायांची स्क्रीन दिसेल. तुमच्या परिस्थितीनुसार खालीलपैकी एका पर्यायाची निवड करा:

पर्याय १: जर तुमचे स्वतःचे नाव २००२ च्या एसआयआर (SIR) यादीत समाविष्ट असेल, तर हा पहिला पर्याय निवडा.

पर्याय २: जर तुमचे नाव २००२ च्या यादीत नसेल, पण तुमच्या आई-वडिलांचे नाव त्या यादीत असेल, तर हा दुसरा पर्याय निवडून त्यांचे नाव सर्च करा आणि त्यांचा पार्ट/सिरियल नंबर (Serial Number) टाकून फॉर्म सबमिट करा.

पर्याय ३: जर तुमचे किंवा आई-वडिलांचे नाव २००२ च्या यादीत नाही, पण चालू २०२५-२६ च्या मतदार यादीत आई-वडिलांचे नाव समाविष्ट असेल, तर हा तिसरा पर्याय निवडा. त्यांचे नाव शोधून सिरियल नंबर टाकून फॉर्म सबमिट करा.

पर्याय ४: जे मतदार वरील तिन्ही अटींमध्ये बसत नाहीत (म्हणजेच ज्यांचे किंवा त्यांच्या कुटुंबाचे नाव कोणत्याही जुन्या किंवा नव्या एसआयआर यादीत सापडत नाही), त्यांनी या चौथ्या पर्यायाची निवड करायची आहे. हा पर्याय निवडून आपली संपूर्ण वैयक्तिक माहिती काळजीपूर्वक भरा आणि फॉर्म सबमिट करा.

मतदार नोंदणी किंवा दुरुस्तीचा अर्ज ऑनलाईन सबमिट केल्यानंतर तो यशस्वीरीत्या अपलोड झाला आहे का, हे जाणून घेणे आता सोपे झाले आहे. खालील सोप्या स्टेप्स फॉलो करून तुम्ही घरबसल्या तुमच्या अर्जाची स्थिती (Status) तपासू शकता:

सर्वप्रथम निवडणूक आयोगाच्या voters.eci.gov.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्या. मुख्य पानावर

# केतनसाठी बहिणीचे गणरायाला साकडे



**पुणे** : पुण्यातील बहुचर्चित केतन अग्रवाल हत्या प्रकरणाला आज बरोबर एक महिना पूर्ण झाला आहे. या घटनेनंतर अद्याप कुटुंबाला न्यायाची प्रतीक्षा आहे. याच पार्श्वभूमीवर केतनची बहीण संजना अग्रवाल यांनी पुण्यातील आराध्य दैवत असलेल्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात जाऊन बाप्पाचे दर्शन घेतले. अत्यंत भावुक अवस्थेत त्यांनी गणपती बाप्पाच्या चरणी प्रार्थना करत आपल्या भावाला लवकरात लवकर न्याय मिळावा, असे साकडे घातले. न्यायव्यवस्थेवरील विश्वासासोबतच आता या दुःखी कुटुंबाने देवाकडेही आपल्या भावाच्या आत्म्याच्या शांतीसाठी आणि न्यायासाठी धाव घेतली आहे.

‘एक महिना झाला, त्याचा आवाज ऐकला नाही’

मंदिरात दर्शन घेतल्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना संजना अग्रवाल यांना अश्रू अनावर झाले. आपल्या मनातील साठलेल्या भावना व्यक्त करताना त्या म्हणाल्या, “आज माझ्या भावाला जाऊन बरोबर एक महिना पूर्ण झाला आहे. या एका संपूर्ण महिन्यात मी त्याला एकदाही पाहिलेले नाही, त्याचा आवाज ऐकलेला नाही किंवा त्याचे निरागस हसणेही माझ्या कानावर पडलेले नाही. तो आता आपल्यात नाही यावर अजूनही आमचा विश्वास बसत नाही. मी श्री गणेशाकडे फक्त एकच प्रार्थना करते की, माझ्या भावाला लवकरात लवकर न्याय मिळावा. तो आता जिथे कुठे असेल, तिथे तो सुखात आणि शांततेत असावा, हीच माझी बाप्पाकडे प्रार्थना आहे.”

आजचा दिवस अग्रवाल कुटुंबासाठी दुहेरी भावनांचा आणि अत्यंत कठीण आहे. एका बाजूला घरातील तरुण मुलाच्या मृत्यूला एक महिना पूर्ण झाला आहे, तर दुसरीकडे आजच त्यांच्या आजोबांचा वाढदिवस आहे. याविषयी अत्यंत जड अंतःकरणाने बोलताना संजना म्हणाल्या, “आज माझ्या आजोबांचा वाढदिवस आहे, पण आमच्या घरात कसलाही आनंद उरलेला नाही. गेल्या एका महिन्यापासून आमचे संपूर्ण कुटुंब या प्रचंड दुःखाच्या छायेत जगत आहे. घरातील तरुण मुलाचा असा अचानक अंत झाल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. रोज त्याच वेदनांना सामोरे जावे लागत आहे. आता हे दुःख आमच्या कुटुंबाला आणखी सहन होत नाहीये.”

त्वरित न्याय मिळण्याची मागणी

केतन अग्रवाल यांच्या हत्येने संपूर्ण पुणे शहरात मोठी खळबळ उडवून दिली होती. आता या घटनेला एक महिना उलटून गेल्यानंतरही कुटुंबातील आक्रोश आणि डोळ्यांतील अश्रू शांत झालेले नाहीत. संजना अग्रवाल यांनी दगडूशेठ गणपतीच्या दरबारात आपली व्यथा मांडत, प्रशासनाने आणि पोलीस यंत्रणेने या प्रकरणाचा वेगाने तपास करून दोषींना लवकरात लवकर कठोर शिक्षा करावी, अशी आग्रही मागणी केली आहे. 'आमच्या कुटुंबाचा आणखी अंत न पाहता आम्हाला त्वरित न्याय द्यावा', अशी आर्त हाक संजना यांनी दिली असून, त्यांच्या या भावुक आवाहनाने तिथे उपस्थित असलेल्या सर्वांचेच डोळे पाणावले आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १९ जुलै २०२६


## जिंतूर आगाराची तपासणी: अधिकाऱ्यांनी केले मार्गदर्शन



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** जिंतूर आगारास परभणी विभाग नियंत्रक संदीप पडवळ यांच्या मार्गदर्शनात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेटी देत चालक,वाहक व यांत्रिक कर्मचाऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.वाहतूक अधिकारी सोळुंके यांनी असे सांगितले की चालकांनी आपले वाहन शांतपणे मार्गस्थ करावे,आपल्या कडून अपघाताचे प्रमाण होऊ नये या साठी योग्य काळजी घेऊन काळजीपूर्वक वाहन चालवावे व नियमांचे काटेकोर पालन करून अपघाताचे प्रमाण होणारच नाही अशी काळजी प्रत्येक एसटी चालकांनी घ्यावे असे आव्हान केले..प्रत्येक चालकांनी व वाहकानी आपला गणवेश परिधान करावा.प्रवाशी वर्गासोबत वाहकांनी सामंजस्याने वागावे उगाच वाद घालून वेळ वाया घालू नये असा सल्ला दिला.तसेच मुख्यकारागीर व यांत्रिक कर्मचाऱ्यांनी चालकांसी सुसंवाद साधून सुरू असलेल्या पावसाळ्यात गाड्यांची व्यवस्थित कामे वेळेवर करून द्यावी असे आव्हान केले. सुरक्षा दक्षता अधिकारी काळबांडे यांनीही चालकांनी आपल्या कर्त्यव्यावर असताना मद्यपान करू नये.सुरक्षा दक्षता पथका कडून या बाबत वेळोवेळी तपासण्या सुरू राहतील असे सांगुन प्रत्येक चालकांनी आपल्या वाहनात अग्निशमन यंत्र सुस्थितीत आहे किंवा नाही ही पाहणी करावी असे सांगून विविध मुद्दे मांडली आज भेटी दरम्यान पाहणी पथकात सुरक्षा दक्षता अधिकारी काळबांडे,विभागीय वाहतूक अधिकारी एस.पी.सोळुंके, लेखाधिकारी महेश थोरवे,आदींचा समावेश होता.या वेळी जिंतूर आगार वाहतूक निरीक्षक प्रमोद निर्मले,आगार लेखाकार ज्ञानेश्वर पांचाळ, मुख्य कारागीर सुनील पंडित,वाहन परीक्षक देवकर,लिपिक गजानना गीते,गजानन घुगे,गुणीरत्न वाकोडे चालक वाहक व यांत्रिक कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## व्हाईस ऑफ मीडियाच्या जिंतूर तालुका कार्यकारिणीची बिनविरोध




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** पत्रकारांच्या न्याय, हक्क आणि सन्मानासाठी कार्यरत असलेल्या व्हाईस ऑफ मीडियाच्या जिंतूर तालुका कार्यकारिणीची बिनविरोध निवड शुक्रवारी (दि. 17) सर्वानुमते करण्यात आली. संघटनेच्या बैठकीत नव्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. यामध्ये तालुकाध्यक्षपदी सचिन रायपत्रीवार, तर सचिवपदी दिलीप देवकर यांची निवड करण्यात आली. तसेच माजी तालुकाध्यक्ष भागवत चव्हाण यांची जिल्हा संघटकपदी निवड झाल्याबद्दल उपस्थितांनी त्यांचा गौरव केला.ही बैठक व्हाईस ऑफ मीडियाचे राज्य कार्याध्यक्ष विजय चोरडिया यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष कैलास चव्हाण होते. यावेळी ज्येष्ठ पत्रकार राजाभाऊ नगरकर, जिल्हा उपाध्यक्ष मंचकराव देशमुख, साप्ताहिक विंगचे प्रदेश उपाध्यक्ष नेमिनाथ जैन, माजी तालुकाध्यक्ष भागवत चव्हाण, आनंदकुमार मुरक्या, रंगनाथ गडदे, प्रभाकर कुरे आदी मान्यवर उपस्थित होते.नवीन कार्यकारिणीत कार्याध्यक्षपदी मुंजा कंठाळे व किसानप्रसाद खाडे, उपाध्यक्षपदी संदीप माहूरकर, गणेश ठाकूर व श्रीपाद जोशी, सचिवपदी दिलीप देवकर, सहसचिवपदी तुकाराम सर्जे, संघटकपदी प्रशांत मुळी, सहसंघटकपदी पंकज चव्हाण, कोषाध्यक्षपदी रामकिशन ठोंबरे, सहकोषाध्यक्षपदी संतोष तायडे, प्रसिद्धीप्रमुखपदी राम रेघाटे यांची निवड करण्यात आली. कार्यकारिणी सदस्य म्हणून आबासाहेब देशमुख, अतुल जगताप, राजू गारकर, शंतनु कुलकर्णी, अशोक उकंडे, शिवानंद कंठाळे, संतोष लहाने व पद्माकर कौसडीकर यांचीही बिनविरोध निवड करण्यात आली.बैठकीस गुलाबराव शिंदे, चंद्रकांत गवळी, एकनाथ अवचार, अशोकराव उकंडे, यादव मस्के, नितीन बंगाळे, रामा ढगरगे, दीपक राजूरकर, भास्करराव चौधरी यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन करून संघटनेच्या माध्यमातून पत्रकारांच्या हितासाठी अधिक प्रभावीपणे कार्य करण्याचे आवाहन केले.चौकट*चार वर्षांच्या कार्याची दखल; भागवत चव्हाण यांच्यावर जिल्हा संघटकपदाची जबाबदारीव्हाईस ऑफ मीडियाचे माजी जिंतूर तालुकाध्यक्ष भागवत चव्हाण यांची जिल्हा संघटकपदी निवड करण्यात आली. राज्य कार्याध्यक्ष विजय चोरडिया यांच्या हस्ते त्यांना निवडपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष मंचकराव देशमुख यांनी चव्हाण यांनी गेल्या चार वर्षांत संघटनेच्या बळकटीसाठी केलेल्या कार्याचा गौरव करत त्यांच्या संघटन कौशल्याचे कौतुक केले. नव्या जबाबदारीतून जिल्हाभर संघटना अधिक सक्षम करण्यासाठी कार्य करावे, अशा शुभेच्छाही उपस्थित मान्यवरांनी दिल्या.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १९ जुलै २०२६


## 'नो बॅग डे' आणि 'जॉयफुल सॅटरडे' च्या माध्यमातून 'इकरा पब्लिक स्कूल मोहाडी' तर्फे विद्यार्थ्यांना तणावमुक्त शैक्षणिक वातावरण



**जळगाव** : शिक्षण मंत्रालयाच्या 'नो बॅग डे' (No Bag Day) आणि 'जॉयफुल सॅटरडे' (Joyful Saturday) मार्गदर्शक तत्त्वांतर्गत, आज 18 जुलै रोजी 'इकरा पब्लिक स्कूल, मोहाडी' च्या वतीने विद्यार्थ्यांच्या मानसिक व शारीरिक विकासासाठी आणि प्रात्यक्षिक शिक्षणाला (Experiential Learning) चालना देण्यासाठी 'लांडोर खोरी गार्डन' येथे एका विशेष सहलीचे आयोजन करण्यात आले होते.या उपक्रमादरम्यान विद्यार्थी मोबाईल स्क्रीन आणि पुस्तकांच्या ओझ्यापासून दूर, निसर्गाच्या सानिध्यात आपल्या मित्र-मैत्रिणी आणि शिक्षकांसह मनसोक्त वावरताना दिसले.विद्यार्थ्यांनी विविध मैदानी खेळांचा आनंद घेतला आणि भरपूर धमाल केली.सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी एकमेकांसोबत घरून आणलेला डबा शेअर करत जिव्हाळा आणि बंधुभावाचा एक उत्तम आदर्श सादर केला.विद्यार्थ्यांना मानसिक तणावापासून मुक्त ठेवणे हा शाळा प्रशासनाचा नेहमीच मुख्य उद्देश राहिला आहे.शाळा ही मुलांसाठी कोणतीही बंदिस्त जागा न वाटता, ती एक सुरक्षित, आनंदी आणि ज्ञानार्जनाचे एक आदर्श केंद्र वाटावी, यासाठी शाळा सदैव कटिबद्ध आहे. म्हणूनच, इकरा पब्लिक स्कूल नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण आरोग्याला आणि मैदानी उपक्रमांना Outdoor Activities प्राधान्य देत आले आहे.शाळेच्या या अत्यंत स्तुत्य, आरोग्यदायी आणि कल्पक उपक्रमाचे सर्व पालकांनी मनापासून स्वागत केले आहे. अशा उपक्रमांमुळे मुलांचा मानसिक विकास वेगाने होतो आणि त्यांच्यात एक नवीन ऊर्जा निर्माण होते, अशा भावना व्यक्त करत पालकांनी शाळा प्रशासनाचे विशेष आभार मानले.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वरुड नृसिंह येथील सर्व विद्यार्थी यांना स्कूल बॅग व छत्रीचे वाटप




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** : जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वरुड नृसिंह येथे ग्रामीण गरजू लेकरांना मदतीचा हात देऊ त्यांच्या उज्वल भविष्याला साथ... या उदात्त भावनेतून दीपस्तंभ प्रतिष्ठान जिंतूर व संजरी बिल्डर्स जिंतूर यांच्या भरीव योगदानातून सर्व विद्यार्थ्यांना स्कूल बॅग व छत्री वितरण सोहळा भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आला. या वितरण सोहळ्यासाठी दीपस्तंभ प्रतिष्ठान जिंतूरचे ध्रुव मेघनादीदी दीपक साकोरे, विराज बोर्डीकर, संजरी बिल्डर्स जिंतूरचे अब्दुल नाफे, स्थायी समिती सदस्य तथा जि प सदस्य परभणी सौ. संगीताताई राजेंद्र थिटे, सरपंच वरुड नृसिंह सौ शीलाताई गोविंद थिटे, लेखाधिकारी तथा प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजना अधीक्षक वर्ग २ त्र्यंबक पोले, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष केशव राऊत, उपसरपंच सौ. सुवर्णा राजेंद्र ताटे, उपाध्यक्ष श्रीमती शकुंतला महादेव पितळे, शाळा व्यवस्थापन समिती सौ. मं◌ंगल रामकिशन गायकवाड, सौ. सिमिता कृष्णा हजारे, सौ. रुपाली अनिल थिटे, सौ. मुक्ता दिपक गिऱ्हे, बालासाहेब गुडीबा चव्हाण, हनुमान शेषराव थिटे,शिवराम राजाराम माघाडे, सौ. रेविता उद्धव डोंबे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या प्रसंगी सर्व विद्यार्थी यांनी नियमित उपयोगात येणारी स्कूल बॅग व छत्री दिल्याबद्दल उपस्थित मान्यवरांचे आभार मनोगत, वेगवेगळे ग्रीटिंग्स च्या माध्यमातून व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद व उत्साह मोठ्या प्रमाणात दिसून आला. या सोहळ्यात बोलताना दीपस्तंभ प्रतिष्ठान जिंतूरच्या ध्रुव साकोरे यांनी विद्यार्थ्यांना नियमित शाळेत येण्याचे, लक्ष देऊन अभ्यास करण्याचे, व मोठी स्वप्न बघून मोठे होण्याचे आवाहन केले. त्र्यंबक पोले यांनी गावातील सर्व नागरिकांनी शाळा व शाळेतील विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी प्रयत्न केले पाहिजेत. शाळेला गावाचा आधार व गावाला शाळेचा अभिमान असला पाहिजे असे प्रतिपादन केले. राजेंद्र थिटे यांनी हा अतिशय स्तुत्य व समाज उपयोगी उपक्रम राबवल्याबद्दल दीपस्तंभ प्रतिष्ठान व संजरी बिल्डर्स यांचे आभार मानले. मुख्याध्यापक सटवाजी घनसावंत यांनी कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन केले. यासाठी शाळेतील शिक्षक अलका खिल्लारे, उत्तम जाधव, प्रल्हाद पाणबुडे, महेश मानकरी, मयूर जोशी, रचना डोंगरे, राजश्री स्वामी, उमेश तायडे यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साहित्यिक मयूर जोशी यांनी केले.

## शिक्षणासह खेळालाही प्राधान्य : डॉ. येळीकर



**छत्रपती संभाजीनगर** : देवगिरी कनिष्ठ महाविद्यालयामध्ये अकरावी विज्ञान वर्गात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी पालक शिक्षक मेळाव्याचे आयोजन दि. 18 जुलै 2026 रोजी महाविद्यालयाच्या रवींद्रनाथ टागोर सभागृहात करण्यात आले होते. याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.रवि पाटील, प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. आदित्य येळीकर, उपप्राचार्य/संचालक JEE NEET CELL प्रा.अरुण काटे, उपप्राचार्य प्रा.ज्ञानेश्वर हिवरे, उपप्राचार्य प्रा. विजय नलावडे यांची उपस्थिती होती. यावेळी पालक मेळाव्याचे प्रास्ताविक व वार्षिक नियोजन विज्ञान विभागाचे उपप्राचार्य अरुण काटे यांनी केले. महाविद्यालयात होणाऱ्या विविध उपक्रमाची माहिती देऊन विद्यार्थी ,पालक, शिक्षक असा ऋणानुबंध निर्माण व्हावा अशी भूमिका व्यक्त करून शिस्त, स्वच्छता, सुरक्षा, अभ्यासक्रम, आणि उपक्रम या पंचसूत्रीचे महत्व पटवून दिले. तसेच संस्थेची आणि महाविद्यालयाच्या विकास आणि प्रगतीचे माहिती देऊन विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थी स्वतःच्या पायावर कसा उभा राहील हा दृष्टिकोन ठेवून महाविद्यालयाने राबवलेले विविध कोर्सेस, योजना,JEE, NEET, MHT-CET या सेल संबंधी पालक आणि विद्यार्थ्यांना सखोल आणि सविस्तर मार्गदर्शन केले. महाविद्यालयातला प्रत्येक शिक्षक हा विद्यार्थ्यांसाठी अज्ञानाकडून ज्ञानाकडे आणि ज्ञानाकडून यशाकडे कशी वाटचाल करेल यासाठी परिपूर्ण मेहनत घेत आहे याविषयी सविस्तर विवेचन केले.डॉ अदित्य येळीकर येळीकर यांनी विद्यार्थ्यांना स्टीव्ह जॉब्स यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासाची कथा सांगून ध्येय, सातत्य आणि संघर्षातून यश मिळवण्याचा संदेश देण्यात आला. विद्यार्थ्यांनी आपल्या आवड, क्षमता व कौशल्यांनुसार अभियांत्रिकी, वैद्यकीय, तंत्रज्ञान, संशोधन, व्यवस्थापन, कला, क्रीडा, प्रशासन व उद्योजकता अशा विविध क्षेत्रांतील करिअरच्या संधींचा विचार करून योग्य दिशा निवडावी, असे मार्गदर्शन करण्यात आले. अध्यक्षीय समारोपात डॉ. रवि पाटील यांनी महाविद्यालयाची वैभवशाली परंपरा सांगून राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर देवगिरी महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या हितासाठी केलेले कार्य विशद केले तसेच पुढील पिढी घडविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत यासाठी प्रत्येक मुलांनी आपल्या आई-वडिलांचे स्वप्न साकार करावे आणि अकरावी आणि बारावी अशा दोन वर्षाचे सूक्ष्म नियोजन करून जीवनात यशस्वी व्हावे असे आवाहन केले. यावेळी पालकांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना मान्यवरांनी उत्तर दिले. पालक मेळाव्याच्या निमित्ताने विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून श्रुती देशपांडे व जगदीश देशपांडे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रमुख अतिथी व पालकांचे स्वागत संगीत विभागप्रमुख डॉ.तुकाराम वांढरे यांच्या स्वागतगीताने झाले.पालक मेळावा यशस्वी करण्यासाठी पर्यवेक्षक डॉ.किरण पतंगे, प्रा.श्रीमती.अनघा देशपांडे, डॉ. राजन राजपूत, विभाग प्रमुख प्रा.उज्ज्वला भोसले पालक मेळावा समिती प्रमुख डॉ.शिवांगी खंदारे, प्रा. उमाकांत कोरे,प्रा.मोनाली पालोदकर, प्रा.दिपाली काठोळे, प्रा.वंदना वाघमारे, प्रा.सुनीता गवळी, प्रा.विद्या सूर्यवंशी, प्रा.माधव जाधव, प्रा.साईनाथ लंबाडे,प्रा.अमर कंटुले,प्रा. नीलिमा वाबळे, प्रा.आशा करंडे, प्रा.मंजुषा पवार, प्रा.सुरज सोनवणे, प्रा. मशरत पठाण, प्रा.वर्षा पाटील, प्रा.सरोज पांडे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ.बाळासाहेब शिंदे यांनी मानले.

## अणणाभाऊ साठे

अण्णाभाऊ साठे शिकले
दीड दिवसाची शाळा
शब्दावर होता त्यांचा
सदा अतूट लळा

त्यांच्या लेखणीला होती
विद्रोहाची धार
उपेक्षितांच्या अन्यायाविरुद्ध
केले त्यांनी वार

मराठी साहित्याचा आवाज
रशिया पर्यंत नेला
जगात माय मराठीला
गौरव मिळवून दिला

श्रमिकांच्या हक्कासाठी
जीवाचे केले रान
शाहीर अण्णाभाऊ साठे
साहित्य रत्नाची खान

कर्मठ रूढी परंपरेला
दिली त्यांनी मुठमाती
लोकनाट्य व पोवाड्यातून
प्रबोधन घेतले हाती

पुरोगामी विचारांचे
होते ते महामेरू
त्यांच्या आदर्शाचा ठसा
आपण मनी धरू



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.9011559106**

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ठाकरवाडीत इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांना केंद्रप्रमुखांच्या हस्ते मोफत वह्या-पुस्तकांचे वाटप



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** गल्ले बोरगाव केंद्राचे विद्यार्थीप्रिय केंद्रप्रमुख मा.श्री.हार्दे यांनी जि.प.प्रा.शाळा ठाकरवाडी येथील गरीब व आदिवासी कुटुंबातील एकूण ३० विद्यार्थ्यांना दरवर्षीप्रमाणे याही वर्षी वह्या व बालचित्र वाचन पुस्तके यांचे मोफत वाटप केले.विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी, शिक्षणाची आवड वाढावी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल व आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आदिवासी विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा आणि त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आवश्यक शैक्षणिक साहित्य वेळेत उपलब्ध व्हावे, या उदात्त हेतूने त्यांनी केलेले हे कार्य अत्यंत प्रेरणादायी व कौतुकास्पद आहे. केंद्रप्रमुखांनी विद्यार्थ्यांना वह्या पुस्तके देतांना नियमित शाळेत उपस्थित राहून मन लावून अभ्यास करण्याचा संदेश दिला. पहिली मध्ये नव्याने शाळेत प्रवेश घेतलेल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर यावेळी आनंद ओसंडून वाहत होता. ठाकरवाडीतील पालक, ग्रामस्थ आणि शाळेतील शिक्षकांनी मा. श्री. हार्दे साहेब यांचे मन:पूर्वक आभार मानले व हार्दिक अभिनंदन केले.त्यांची ही समाजाभिमुख व विद्यार्थीहिताची सेवा निरंतर सुरू राहो आणि त्यांच्या कार्यातून अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य उज्ज्वल होवो,अशा सदिच्छा पालकांनी , शिक्षकांनी दिल्या या कार्यक्रमास शिक्षक श्री भालेराव, श्री गालफाडे, श्रीमती घोरपडे, श्रीमती साबळे शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्षिका वंदना मेंगाळ, सुरेश डोके, शांताराम डोके, बबन कातवारे,राजेंद्र मेंगाळ, प्रल्हाद मेंगाळ, सनिराम गावंडे, विजय डोके, अंकुश पथवे, गिरजाराम पथवे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.









## नागरिकांनी सवलतीच्या दरातील रोपांचा लाभ घेऊन वृक्ष लागवड करावी - जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

**बीड (भगवंत पाळवदे) :** वनमहोत्सव २०२६ च्या निमित्त बीड सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने जिल्हाभरात सवलतीच्या दरात रोपविक्रीला प्रारंभ करण्यात आला आहे. तरी नागरिकांनी सवलतीच्या दरातील रोपांचा लाभ घेऊन मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करावी व त्यांचे संवर्धन करावे आणि "हरित बीड, समृद्ध बीड" तसेच एक पेड माँ के नाम या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते रोपविक्री स्टॉलचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे, विभागीय वन अधिकारी श्रीनिवास लखमावाड, सहायक वनसंरक्षक उमेश बिराजदार, वनपरिक्षेत्र अधिकारी समाधान सानप तसेच विभागातील अधिकारी- कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते. राष्ट्रीय वन धोरण १९८८ नुसार देशाच्या भौगोलिक क्षेत्रापैकी किमान ३३ टक्के क्षेत्र वनाच्छादित असणे अपेक्षित आहे. मात्र सध्या हे प्रमाण २१.२५ टक्के असल्याने वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धनाची गरज अधिक तीव्र झाली आहे. वाढते तापमान, बदलते पर्जन्यमान आणि पर्यावरणीय असमतोल लक्षात घेता मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करणे ही काळाची गरज असल्याचे प्रशासनाने नमूद केले. दरवर्षी १५ जून ते ३० सप्टेंबर हा कालावधी वनमहोत्सव म्हणून साजरा केला जातो. या कालावधीत नागरिकांना वृक्षलागवडीसाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून शासनाकडून सवलतीच्या दरात विविध प्रजातींची रोपे उपलब्ध करून दिली जात आहेत. सामाजिक वनीकरण विभागाने यावर्षी सुमारे २० लाख रोपांची निर्मिती केली असून त्यामध्ये नीम, वड, पिंपळ, उंबर, बेल, कवठ, साग, शिसू, हिरडा, बेहडा, करंज, कांचन, आवळा, पेरू, सिताफळ यांसह ४० ते ५० स्थानिक प्रजातींचा समावेश आहे. अशी माहिती सहायक वनसंरक्षक उमेश बिराजदार यांनी यावेळी दिली. जिल्हाधिकारी कार्यालयातील रोपविक्री स्टॉल पुढील दोन आठवडे सुरू राहणार असून बीएसएनएल कार्यालय परिसरातील स्टॉल १५ जून ते ३० सप्टेंबर या संपूर्ण वनमहोत्सव कालावधीत सुरू राहणार आहे. तसेच सामाजिक वनीकरण विभागाच्या बीड जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांच्या मुख्यालयांवर ही रोपविक्री केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. जिल्ह्यातील नागरिकांनी आपल्या जवळच्या रोपविक्री केंद्राला भेट देऊन सवलतीच्या दरातील रोपे खरेदी करावीत आणि पर्यावरण संवर्धनाच्या या लोकचळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन विभागीय वन अधिकारी श्रीनिवास लखमावाड यांनी केले आहे




## वेतन पथक अधीक्षक (माध्यमिक) पद रिक्त; हजारो शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे कामकाज ठप्प



**हिंगोली (गोपाल सातपुते) :** हिंगोली येथील वेतन पथक अधीक्षक (माध्यमिक) हे अत्यंत महत्त्वाचे पद गेल्या काही काळापासून रिक्त असल्याने जिल्ह्यातील अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या वेतन अनुदानाशी संबंधित कामकाजावर गंभीर परिणाम होत आहे. विविध प्रस्ताव, प्रशासकीय मंजुरी, सेवा विषयक प्रकरणे, वेतनवाढीची कार्यवाही तसेच आर्थिक मंजुरीची अनेक कामे प्रलंबित राहिल्यामुळे हजारो शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, संस्थाचालक व शाळांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.वेतन पथक अधीक्षक हे पद आहरण व संवितरण अधिकारी (DDO) तसेच कार्यालय प्रमुख म्हणून कार्यरत असल्याने त्याचे महत्त्व अधिक आहे. विशेषतः जुलै महिन्यात वार्षिक वेतनवाढ, सेवा विषयक मंजुरी आणि इतर आर्थिक बाबींवरील अंतिम स्वाक्षरी या पदाधिकाऱ्यांकडून होणे आवश्यक असते. मात्र पद रिक्त असल्यामुळे सर्व कामांमध्ये अनावश्यक विलंब होत असून त्याचा थेट परिणाम हजारो कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबांवर होत आहे.तत्कालीन वेतन पथक अधीक्षक राम लांडे यांना ३० जून २०२६ रोजी कार्यमुक्त करण्यात आले. त्यानंतर तत्काळ कोणत्याही सक्षम अधिकाऱ्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला नसल्याने कार्यालयाचे दैनंदिन कामकाज, प्रशासकीय निर्णयप्रक्रिया आणि आर्थिक मंजुरीची कार्यवाही ठप्प झाली आहे.या पार्श्वभूमीवर हिंगोली जिल्हा खाजगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकेतर संघटनेच्या वतीने माध्यमिक शिक्षणाधिकारी विपुन भागवत यांना निवेदन देऊन वेतन पथक अधीक्षक (माध्यमिक) पदावर तातडीने नियमित नियुक्ती करावी किंवा तत्पूर्वी सक्षम अधिकाऱ्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपवावा, अशी मागणी करण्यात आली.यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष गोपालराव सरनायक, जिल्हा उपाध्यक्ष संतोष गंगावणे, वसमत तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर जाधव, पांडुरंग भोयर, शेख अली, आकाश बांगर, गजानन वडकुते, कुंडलिक पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी माध्यमिक शिक्षणाधिकारी विपुन भागवत यांनी संबंधित वेतन पथक अधीक्षक पद तातडीने भरण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले.शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व संस्थाचालकांनी प्रशासनाने या गंभीर प्रश्नाची तातडीने दखल घेऊन पर्यायी व्यवस्था करावी व नियमित नियुक्तीची प्रक्रिया लवकर पूर्ण करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. त्यामुळे प्रलंबित कामांना गती मिळून जिल्ह्यातील हजारो शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.






## शेजारी शेजारी आनंदी राहावे

शेजारी असावेत, काळजी घेणारे.
संकटात एकमेका, सदा साथ देणारे.

शेजारधर्म सदा, सर्वांनी पाळावे.
वादाची ठिणगी, कायम टाळावे.

शेजारी शेजारी, सदैव मिळून राहावे.
मदत करून, नयनी आनंद पाहावे.

नित्य प्रेम देऊन, प्रेम मिळवावे.
दु:ख आल्यास, मिळून पळवावे.

सुख दु:ख सदा, एकमेका कळवावे.
रुसल्यास शेजारी, त्याचे मन वळवावे.

सग्या सोयऱ्यापेक्षा, शेजारी लवकर येतो.
जिवाभावाने तो, संकटात साथ देतो.

शेजाऱ्याची साथ, सदा सर्वदा असावे.
शेजाऱ्याशी वैर, कधी कुणाचे नसावे.

**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## लडाखचे रक्षक सोनम वांगचुक यांना आंदोलनस्थळावरून ‘उचलले’; लोकशाही मार्गाने चाललेला आवाज दाबण्याचा प्रयत्न?

लडाखला संविधानाच्या सहाव्या अनुसूचीचा दर्जा मिळावा आणि पर्यावरण रक्षणासाठी दिल्लीत शांततापूर्ण आंदोलन करणारे प्रख्यात पर्यावरणवादी आणि शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांना आंदोलनस्थळावरून वैद्यकीय उपचाराच्या नावाखाली पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.या कारवाईमुळे संपूर्ण देशात संतापाची लाट उसळली असून, 'लोकशाही मार्गाने सुरू असलेला आवाज दाबण्याचा हा प्रयत्न आहे का?' असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.वांगचुक आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी लडाखपासून दिल्लीपर्यंत शेकडो किलोमीटरची पायी यात्रा काढली होती.लडाखच्या नाजूक पर्यावरणाचे रक्षण व्हावे आणि स्थानिकांना त्यांचे हक्क मिळावेत,हीच त्यांची प्रमुख मागणी होती.आंदोलन पूर्णपणे शांततापूर्ण आणि गांधीवादी मार्गाने सुरू होते.मात्र,अचानक 'प्रकृती बिघडल्याचे' कारण पुढे करत प्रशासनाने त्यांना आंदोलनस्थळावरून बाजूला केले.गांधीजींच्या देशात शांततेच्या मार्गाने उपोषण करणाऱ्या व्यक्तीला अशा प्रकारे ताब्यात घेणे कितपत योग्य आहे?वांगचुक यांच्या सहकाऱ्यांच्या मते,त्यांची प्रकृती स्थिर असतानाही केवळ आंदोलन चिरडण्यासाठी वैद्यकीय कारणांचा बहाणा करण्यात आला.हा लढा केवळ लडाखचा नसून संपूर्ण देशाच्या निसर्ग रक्षणाचा आहे.अशा वेळी संवाद साधण्याऐवजी आंदोलकांना हटवणे चुकीचा संदेश देते.सोनम वांगचुक यांनी नेहमीच देशाला नवनवीन शोध आणि सकारात्मक ऊर्जा दिली आहे. आज तेच वांगचुक देशाच्या राजधानीत आपल्या हक्कासाठी उपोषणाला बसले असताना प्रशासनाने दाखवलेली ही घाई संशयास्पद वाटते.सरकारने तातडीने यात हस्तक्षेप करून वांगचुक यांच्याशी सन्मानपूर्वक चर्चा करावी आणि लडाखचा प्रश्न सामोपचाराने सोडवावा,हीच आजच्या घडीला देशातील जनतेची भावना आहे.



**- विजय म्हस्के पाटील**
**मो. नं-९५९५४०११११**
**छत्रपती संभाजीनगर शहर]**


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १९ जुलै २०२६


## दडपशाही

दिल्लीच्या जंतर-मंतरवर,
आज पुन्हा इतिहास रडला;
आवाज उठवणाऱ्या माणसाला,शांत करण्याचा प्रयत्न झाला.

प्रश्नांच्या त्या ठाम पावलांना,
बेड्यांचा का आधार हवा?
लोकशाहीच्या पवित्र भूमीवर,
संवाद का दाबला जावा?

मत मांडणे हा गुन्हा नाही,
विचार मांडणे पाप नाही;
संविधानाच्या प्रत्येक शब्दात,
मुक्त अभिव्यक्तीचं स्वातंत्र्य असताना दडपशाही का हवी?

दडपशाहीच्या काळोखाने,
सत्याचा सूर्य झाकला जात नाही;
वादळ कितीही मोठे असले,
पहाट कधी थांबत नाही.

लोकशाही म्हणजे मतभेदांना,
सन्मानाने ऐकण्याची रीत;
प्रश्नांना उत्तर देणेच असते,
सत्तेची खरी प्रीत.

लाठ्यांनी आवाज दाबाल,
पण विचार दाबला जाईल का?
जनतेच्या मनात पेटलेली ज्योत,
कोणाच्याही भीतीने थांबवली जाईल का?

संवादाची दारे उघडी ठेवायची असतात,
विश्वासाचा पूल तुटू द्यायचा नसतो;
जनतेचा आवाज हा राष्ट्राचा श्वास असतो,
तो थांबला की विध्वंस नक्कीच असतो.

इतिहास पुन्हा लिहिला जाईल,
सत्य पुन्हा उभे राहील;
लोकशाहीच्या प्रत्येक श्वासातून,
स्वातंत्र्याचा जयघोष घुमत राहील.



- डॉ. बाळासाहेब लिहिणार

## जालना येथील शाळेत "लेखक प्रत्यक्ष विद्यार्थ्यांच्या भेटीला" उपक्रम



*छायाचित्र - "लेखक विद्यार्थ्यांच्या भेटीला" उपक्रमात अय्युब पठाण लोहगावकर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना दिसत आहे.*

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** : जालना येथील शाळेत "पाठ्यपुस्तकातील लेखक प्रत्यक्ष विद्यार्थ्यांच्या भेटीला" या कार्यक्रमाचे उद्घाटन शनिवार दि.18 जुलै रोजी, सकाळी 8.30 वा. शांती निकेतन विद्यालय संभाजीनगर जालना येथे शिक्षक आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते आणि जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी बाळासाहेब खरात जालना तसेच जिल्हा परिषद प्राथमिक उपशिक्षणाधिकारी श्रीमती योगिता भागवत जालना प्रा. डॉ. सुखदेव मांटे,ज्ञानेश्वर टेकाळे,उद्धव मस्के, पवन जोशी यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. बालभारतीच्या मराठी पाठ्यपुस्तकातील 'कौतुकाची थाप' इ.4 थी या पाठाचे प्रत्यक्ष लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांनी शांतिनिकेतन विद्यालय संभाजीनगर जालना, जीवनराव पारे विद्यालय चंदनझीरा जालना, शिवाजीराव शेंडगे प्राथमिक विद्यालय चंदनझीरा जालना, श्री विठ्ठल प्राथमिक विद्यालय व माध्यमिक विद्यालय चंदनझीरा जालना, नानासाहेब पाटील प्राथमिक विद्यालय चंदनझीरा जालना, ज्ञानदीप विद्यालय प्राथमिक विद्यालय चंदनझीरा, जालना, तसेच राजश्री शाहू इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज चौधरीनगर, जालना येथील शाळेत लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांनी प्रत्यक्ष भेट देऊन विद्यार्थी, शिक्षकासोबत 'कौतुकाची थाप' या पाठावर दिलखुलासपणे चर्चा केली.आणि विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नाला त्यांनी समर्पक उत्तरे दिली. प्रत्यक्ष पाठ्यपुस्तकातील लेखकाला पाहून विद्यार्थी भारावून गेले होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अनेक लेखक, कवी निर्माण होऊन मराठी भाषा समृद्ध होण्यासाठी व मराठी भाषेची गोडी विद्यार्थ्यांना लागावी अशी माहिती राष्ट्रवादी शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष प्रदीप विखे, शेख वाहेद व मुदस्सर पठाण यांनी दिलेली असून कवी मनोज खुटे यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम घेण्यात आला आहे. या कार्यक्रम प्रसंगी जालना येथील बालासाहेब आबुज, विजय उभरहंडे, उद्धव पवार, रामचंद्र जाधव, शंकर शेरे, सुभाष पारे, विलास शिंदे,सुदर्शन वाघ, प्रभाकर मोरे आदी उपस्थित होते.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
■ प्रोजेक्ट रिपोर्ट ■ डेझर्टेशन
■ पीएच.डी./एम.फिल.थेसिस ■ कलर प्रिंट
■ डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट ■ स्कॅनिंग
■ स्पायरल व हार्ड बायडींग ■ लॅमिनेशन
महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com



डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
DMLT कालावधी २ वर्ष पात्रता : १० वी /१२ वी पास
SANITARY HEALTH INSPECTOR कालावधी १ वर्ष पात्रता : १०वी /१२ वी पास
PG RADIOLOGY कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर) पात्रता : Any B.Sc.
C.T.SCAN कालावधी १ वर्ष पात्रता : १० वी १२ वी पास
E.C.G. कालावधी १ वर्ष पात्रता : १० वी १२ वी पास
PGDMLT कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर) पात्रता : B.Sc (Microbiology, chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)
X-RAY कालावधी १ वर्ष पात्रता : १०वी, १२ वी पास
रेडिओलॉजी कालावधी २ वर्ष पात्रता : १२ वी सायन्स पास
फिजिओथेरपी कालावधी २ वर्ष पात्रता : १२ वी सायन्स पास
ऑप्थोमेट्री कालावधी २ वर्ष पात्रता : १२ वी सायन्स पास
DIALYSIS TECHNICIAN कालावधी १ वर्ष पात्रता : १० वी / १२ वी पास
O.T.TECHINICIAN कालावधी २ वर्ष पात्रता : १० वी १२ वी पास
ADMISSION OPEN
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १९ जुलै २०२६


# मातीतून उमललेला संतत्वाचा सुवास : संत गोरा कुंभारांचे जीवनदर्शन

महाराष्ट्राची संत परंपरा ही सामान्य माणसाच्या असामान्य साधनेची गोष्ट आहे. या परंपरेत ज्ञानेश्वरांचा तत्त्वज्ञानाचा डोंगर आहे, तुकारामांचा भावनेचा सागर आहे, आणि नामदेवांची कीर्तनाची गंगा आहे. पण या सर्वांच्या मध्ये एक शांत, निरलस, आणि मातीचा सुगंध असलेला दिवा सतत तेवत राहिला. तो दिवा म्हणजे संत गोरा कुंभार उर्फ गोरोबा काका.इ.स. १२६७ साली पंढरपूर जवळील तेरढोकी गावी जन्मले गोरोबा हे कोणतेही शास्त्र न शिकले, पण भक्तीचे सर्वोच्च शिखर गाठलेले संत होते. त्यांचा व्यवसाय होता मडकी बनवणे. त्यांची शाळा होती चाक आणि माती. आणि त्यांचे विद्यापीठ होते पंढरीचा विठ्ठल.गोरोबांचे जीवन आपल्याला एकच शिकवण देते: देव वेगळा नाही, आणि काम वेगळे नाही. जे काम तुम्ही करता, ते जर प्रेमाने आणि नामाने केले तर तेच ईश्वरपूजन होते. चला, या मातीच्या संताच्या जीवनाचा, कार्याचा आणि अभंगवाणीचा वेध घेता येईल.गोरोबांचा जन्म तेरढोकी या गावी झाला. हे गाव भीमा नदीच्या काठावर वसलेले आहे. लहानपणापासूनच घरातील वातावरण भक्तिमय होते. वडील कुंभारकाम करत आणि संध्याकाळी विठ्ठलाचे भजन गात. गोरोबांचे लग्न झाले. त्यांना मुलेही झाली. संसार होता, जबाबदाऱ्या होत्या. पण संसाराच्या गर्तेतही त्यांचा जीव कधीच अडकला नाही. कारण त्यांचे खरे घर पंढरीत होते. ते म्हणत,"संसार हा करावा, पण मनाने विठ्ठल भजावा ॥"गोरोबांचा दिवस पहाटे चारलाच सुरू होत असे. माती आणणे, पाण्यात भिजवणे, पायाने तुडवणे, चाकावर बसणे. हे सर्व करताना त्यांच्या ओठावर एकच नाव असे: विठ्ठल.त्यांच्यासाठी चाक म्हणजे कालचक्र होते. माती म्हणजे पंचमहाभूतांचा देह होता. आणि मडके म्हणजे जीवात्मा होता. कुंभार म्हणजे साक्षात पांडुरंग.ते अभंगात म्हणतात,"चाक फिरे नाम घेता, मडके घडे प्रेमे ।गोरा म्हणे विठ्ठले, ठेवूनी मस्तक पाये ॥"म्हणजे चाक फिरवताना नाम घेतो, प्रेमाने मडके घडवतो, आणि शेवटी ते मडके विठ्ठलाच्या पायाशी ठेवतो. बघा किती सुंदर रूपक आहे.गावासाठी ते मडकी बनवत. उन्हाळ्यात माठ, पावसाळ्यात गाडगे, सणाला पणत्या. त्यांच्या हाताला कधी विसावा नव्हता. पण त्यांच्या मनाला मात्र कायम विसावा होता, कारण ते नामात होते.गोरोबांच्या जीवनातील सर्वात मोठा प्रसंग म्हणजे त्यांच्या मुलासोबत घडलेली घटना. एके दिवशी अंगणात माती तुडवायची होती. गोरोबा भजनाच्या परमोच्च अवस्थेत होते. डोळे बंद, हात आकाशाकडे, आणि तोंडातून अविरत "विठ्ठल विठ्ठल" चालू होते. त्याचवेळी त्यांचा लहान मुलगा खेळता खेळता त्या चिखलात आला. भान नसल्याने गोरोबांचा पाय त्याच्यावर पडला आणि मुलाचा प्राण गेला.जेव्हा भानावर आले तेव्हा गोरोबा कोसळले नाहीत. त्यांनी आकाशाकडे हात जोडले आणि आर्त स्वरात हाक मारली."पांडुरंगा माझे माहेरा, धाव घाली वेग करा ।गोरा म्हणे तुझ्या भक्ता, लाज नको देऊ देवा ॥"देवा, तू माझ्या माहेरचा आहेस. लवकर धाव. तुझ्या भक्ताची लाज जाऊ देऊ नकोस. आणि झालेही तसेच. भक्तवत्सल पांडुरंगाने धाव घेतली. मुलगा पुन्हा जिवंत झाला. ही घटना म्हणजे फक्त चमत्कार नव्हती. ही होती "निष्ठेची ताकद" काय असते याची प्रचिती. या घटनेनंतर गोरोबांची कीर्ती दाही दिशांना पसरली.गोरोबा विद्वान नव्हते. पण त्यांचे अभंग आजही विद्यापीठात शिकवले जातात. कारण त्यात अनुभव आहे. त्यांच्या अभंगाची भाषा गावाकडची आहे, पण अर्थ आकाशाएवढा मोठा आहे."प्रेमे अंगी असे झाकुनी नयन ।करित भजन विठोबाचे ॥"प्रेमाने अंग भरून येते, डोळे आपोआप मिटतात, आणि मग फक्त विठोबाचे भजन चालू होते. बाहेरचे जग संपते. यावर संत नामदेवांनी शिक्कामोर्तब केले,"प्रेमे अंगी सदा वाचे भगवंत ।ही तन्मयवृत्ती ॥"ज्याच्या अंगात प्रेम आहे आणि जिभेवर भगवंताचे नाव आहे, त्यालाच खरी तन्मयता म्हणता येईल."हात काम करी, मन पंढरीसी वारी ।गोरा म्हणे हरि, मज देई दर्शन ॥"हात काम करतोय, पण मन पंढरीला गेले आहे. देवा, मला दर्शन दे.गोरोबांमध्ये अहंकाराचा लवलेशही नव्हता."अल्पमती गोरा, तुझ्या नामाचा किंकर ।तारी आता पांडुरंगा, भवसागरा तार ॥"मी अल्पमती आहे देवा. मी फक्त तुझा नोकर आहे. मला या भवसागरातून तार.त्यांच्यासाठी राजा आणि रंक सारखे होते. कारण दोघांच्याही आत तोच विठ्ठल आहे."घटाघटात हरी, दिसे गोरा स्पष्ट ,जातिभेद मानू नका, सारे जण एकमेकांचे नात" गोरोबा मातीतूनच अध्यात्म शिकले."माती तुडविता पाय, कळे माया काय ।गोरा म्हणे कुंभार, आहे माझा पांडुरंग ॥"माती तुडवताना कळते की ही माया आहे. आणि खरा कुंभार माझा पांडुरंग आहे. तो आपल्याला आकार देत आहे.गोरोबा आणि नामदेव समकालीन होते. दोघांमध्ये गुरु-शिष्यासारखे प्रेम होते. एकदा नामदेवांनी पाहिले की गोरोबा माती तुडवताना पायाने विठ्ठलाच्या मूर्तीला स्पर्श करत आहेत. नामदेव रागावले. "हे काय?" गोरोबा म्हणाले, "महाराज, ज्या दिशेला देव नाही तिकडे पाय करा."नामदेवांनी जिकडे पाय केला तिकडे मूर्ती प्रकट झाली. तेव्हापासून नामदेव म्हणाले, "गोरोबा, तू भोळा आहेस, पण तुझी भक्ती खरी आहे." आणि त्यांनीच गोरोबांना "तन्मयवृत्तीचा संत" ही उपाधी दिली.गोरोबांनी कधीच जात पाहिली नाही. त्यांच्या दारात जो येईल त्याला ते मडके देत. त्यासाठी पैसेही मागत नसत. ते म्हणत, "झाडे तोडू नका. ती विठ्ठलाचीच रूपे आहेत." मातीचा वापर करताना देखील ते मातीला देव मानत. त्यांची पत्नीही भक्त होती. गोरोबा तिला "सहधर्मचारिणी" म्हणत. संसार करताना देखील भक्ती करता येते हे त्यांनी दाखवले. गोरोबा फार गंभीर नव्हते. ते भजनात नाचतही असत. लोकांना हसवत असत. भक्ती म्हणजे रडणे नाही, आनंद आहे हे त्यांनी शिकवलेवारकरी संप्रदायात गोरोबांना "पंचकृष्ण" पैकी एक मानले जाते. ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकनाथ आणि गोरोबा. आषाढी वारीला तेरढोकी हे एक महत्त्वाचे मुक्कामाचे ठिकाण आहे. लाखो वारकरी इथे थांबतात. गोरोबांच्या चाकाला आणि पायांच्या ठशांना नमस्कार करतात. "तेरढोकीचा गोरा, नामे नाचत होता ।पांडुरंग पाठीमागे, टाळ मृदुंग वाजता ॥"आज आपण धावतो आहोत. पैसा आहे, पण शांती नाही. प्रगती आहे, पण समाधान नाही. अशा वेळी गोरोबा आपल्याला सांगतात.तुम्ही जे काम करता ते १००% प्रामाणिकपणे करा. ते देवाला अर्पण करा. मग ते स्वयंपाक असो की कोडिंग.गोरोबा म्हणत, "काम करता नाम घ्या." आज आपणही ड्रायव्हिंग करताना, चालताना नाम घेऊ शकतजास्त अपेक्षा नको. जे आहे त्यात आनंद मान. कारण "तुका म्हणे सुख, पाहे माझ्या विठ्ठल ।गोरा म्हणे त्यासी, न लगे दुसरे धन ॥""माझे अंग झाले शेण, माझे मन झाले लीन ।गोरा म्हणे देवा, तूच माझा कैवारी ॥"मी शेणासारखा आहे, लीन आहे. तूच माझा सांभाळ करणारा आहेस. "नको मला राजयोग, नको मला भोग ।देवा तुझ्या पायी, ठेव माझा सर्वांग ।मला राजाचा योग नको, भोग नको. फक्त तुझ्या पायाशी जागा दे."जेथे नाम तेथे मी, हे वचन सत्य ।गोरा म्हणे पाहा, विठ्ठल उभा समीप ॥"अर्थ: जिथे नाम आहे तिथे मी आहे. बघा, विठ्ठल अगदी जवळ उभा आहे. संत गोरा कुंभार यांचे आयुष्य फार मोठे नव्हते. पण त्यांनी जे जगून दाखवले ते मोठे होते. त्यांनी सांगितले की संत होण्यासाठी संन्यास घ्यावा लागत नाही. घरात राहून, संसार करून, काम करूनही संत होता येते. फक्त अट एकच आहे, ती म्हणजे "तन्मयता".आज तेरढोकीला त्यांचे मंदिर आहे. आत त्यांचे चाक आहे. बाहेर भीमा नदी वाहते. आणि वारकऱ्यांच्या ओठावर अजूनही त्यांचे अभंग आहेत."गोरा म्हणे शेवटी, ठेविला भार तुझ्या पायी ।आता जन्ममरणाची, फेरी नको माझी ॥"देवा, मी सर्व भार तुला दिला. आता मला जन्ममरणाच्या फेऱ्यातून सोडव.मातीत जन्मलेला हा माणूस, मातीतच कर्म करणारा हा माणूस, आज मातीपेक्षा ही पवित्र आणि आकाशापेक्षा ही उंच झाला आहे. कारण त्याने आपल्या हातांनी फक्त मडकीच घडवली नाहीत, तर माणसांची मनंही घडवली.




- प्रा डॉ राजेंद्र सोनवणे.



